
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 21 मे 2026 | अंक क्र. 358 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# 'मामा, काय झालं गाडीला?

## विचारलं अन् वृद्धाला लाथाबुक्क्यांनी मारून दुचाकीसह रोकड लुटली

## बीड पोलिसांकडून २४ तासांत मुख्य आरोपी जेरबंद

## गेवराई पोलिसांनी CCTV आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आवेज खानला ठोकल्या बेड्या; दुसरा आरोपी फरार




■ गेवराई प्रतिनिधी

**पहाटेच्या सुमारास काम संपवून घरी परतणाऱ्या एका वृद्धाला गाठून, "मामा काय झाले गाडीला?" अशी खोटी विचारपूस करत लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण करणाऱ्या आणि त्यांची दुचाकी व रोकड लुटणाऱ्या सराईत टोळीचा बीड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. गेवराई पोलीस ठाण्याच्या पथकाने अत्यंत जलदगतीने तपास करत २४ तासांच्या आत मुख्य आरोपी आवेज खान परवेज खान (वय २५, रा. बार्शी नाका, बीड) याला सापळा रचून अटक केली आहे. त्याच्याकडून चोरलेली दुचाकी आणि रोकड हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.**



### पहाटे साडेचार वाजता रांजणी शिवारात थरार

■ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे २०२६ रोजी पहाटे ०४.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी सुदाम सावंत हे 'जय भवानी साखर कारखाना' येथून आपले काम संपवून स्प्लेंडर मोटरसायकलने (क्रमांक MH23BB2034) आपल्या घरी चालले होते. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ जवळील रांजणी शिवार येथे ते लघुशंकेसाठी थांबले असता, पाठीमागून एका स्कूटीवरून दोन अनोळखी तरुण तिथे आले. त्यांनी सावंत यांना "मामा काय झाले गाडीला?" असे विचारून गाफील ठेवले आणि अचानक लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपींनी सावंत यांच्या खिशातील १४०० रुपयांची रोकड आणि त्यांची स्प्लेंडर दुचाकी जबरदस्तीने चालू करून घटनास्थळावरून पोबारा केला होता.

### CCTV फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांनी आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

या धक्कादायक लुटीची माहिती मिळताच बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सतिश कोटकर व त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरवली. पोलिसांनी महामार्गावरील मोक्याच्या ठिकाणचे CCTV फुटेज तपासले. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या (Cyber Cell) आधारे आरोपी निष्पन्न करून आवेज खान याला बीडमधून अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्याचा दुसरा फरार साथीदार गजाआड करण्यासाठी पोलीस कसून शोध घेत आहेत. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २९८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोहेकॉ/५७३ लक्ष्मण जायभाये करत आहेत. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांढरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सतिश कोटकर, पोउपनि प्रदीप आढाव, पोकॉ ऋषिकेश पोटे, विनोद कुटे, भरत शेळके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे (LCB) अंमलदार अशपाक सय्यद यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पोलिसांच्या या कामगिरीमुळे महामार्गावरील वाहनधारकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

# 'विलिनीकरणाचा विषय संपला'

## शरद पवारांच्या नेतृत्वाखालीच लढणार : शशिकांत शिंदे यांचा स्पष्ट निर्वाळा

■ मुंबई | वृत्तसंस्था

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबत जोरदार चर्चा सुरू होत्या. मात्र आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष Shashikant Shinde यांनी 'विलिनीकरणाचा विषय आता पूर्णपणे संपला आहे,' असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षाची महत्त्वपूर्ण संघटनात्मक आढावा बैठक पार पडली. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना शशिकांत शिंदे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सक्षम विरोधी पक्ष उभा करण्यासाठी पक्षातील खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी आपापली मते मांडली. त्यामुळे आता मी स्पष्ट सांगतो की, विलिनीकरणाचा विषय पूर्णतः संपलेला आहे. यापुढे याबाबत कोणतीही चर्चा होणार नाही. आम्ही शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे महाराष्ट्रात पुढे जाणार



आहोत."

दरम्यान, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी शरद पवारांची घेतलेली भेट आणि त्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमावरही त्यांनी भाष्य केले. "शरद पवारांना अनेक नेते भेटत असतात. अनेक वर्षे त्यांनी एकत्र काम केले आहे. त्यामुळे कोणी भेटायला आले, तर त्याचा वेगळा अर्थ काढण्याची गरज नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

पक्षातील मतभेदांच्या चर्चांबाबत बोलताना त्यांनी रोहित पवार यांनी व्यक्त केलेल्या सूचनांचे स्वागत केले. "रोहित पवार यांनी काय मत मांडले आहे, ते मी ऐकून घेईन. पक्षाच्या चौकटीत आणि शिस्तीत राहून आम्ही सर्वांनी एकत्रित काम करायचे आहे. त्यांची काही खंत असेल तर ती दूर करून भविष्यात आक्रमकपणे आंदोलन उभारू," असे शिंदे म्हणाले. येत्या दोन दिवसांत पक्षाचे शिबिर आयोजित करण्यात येणार असून, संघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच नीट परीक्षेतील गोंधळ, महागाई, गॅस दरवाढ, पेट्रोल-डिझेलची टंचाई यांसारख्या जनतेच्या प्रश्नांवर पक्ष आक्रमक भूमिका घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

"पक्ष मजबूत करणे, कार्यकर्त्यांना प्राधान्य देणे आणि एकविचाराने पक्षाच्या चौकटीतून पुढे जाणे, हेच आमचे ध्येय आहे. कुणी स्वतंत्र मत मांडले तरी त्यांना सोबत घेऊन पक्षाची भूमिका समजावून सांगत आम्ही पुढे वाटचाल करू," असे सांगत शशिकांत शिंदे यांनी पक्षातील एकजूट कायम असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना उधाण

## भाजपने राजकारण बाजूला ठेवून देशाच्या प्रश्नांवर बोलावे : आदित्य ठाकरे

■ मुंबई | वृत्तसंस्था

शिवसेना (ठाकरे गट)च्या काही खासदारांनी सत्ताधारी पक्षातील नेत्यांच्या घेतलेल्या भेटींमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा पुन्हा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका करत देशातील गंभीर आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांकडे लक्ष वेधले.

गेल्या दोन दिवसांत हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची, तर शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत याबाबत विचारलेल्या प्रश्नावर आदित्य ठाकरे म्हणाले की, "राजकारणात



संपर्क ठेवणे ही सामान्य बाब आहे. मात्र गेल्या चार वर्षांत महाराष्ट्राने अत्यंत घाणेरडे राजकारण पाहिले आहे. पक्ष फोडण्याचे, आमिष दाखवण्याचे आणि धमकावण्याचे प्रकार सातत्याने सुरू आहेत. भाजपने या गोष्टींपलीकडे जाऊन देशाच्या खऱ्या प्रश्नांवर भाष्य केले पाहिजे."


ते पुढे म्हणाले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री आणि केंद्रीय शिक्षणमंत्री यांनी पत्रकार परिषद घेऊन देशाच्या आर्थिक स्थितीबाबत भूमिका स्पष्ट करावी. रुपया घसरत आहे, शेअर बाजार कोसळत आहे आणि महागाईने सामान्य नागरिक त्रस्त झाला आहे. यावर सरकारने उत्तर द्यायला हवे."


मोदींनी काही दिवसांपूर्वी परदेशात जाणे टाळा आणि सोन्याची खरेदी करू नका, असे आवाहन केले होते. त्यावर भाष्य करत आदित्य ठाकरे म्हणाले, "देशाच्या अर्थव्यवस्थेत सोन्याच्या बाजाराचा मोठा वाटा आहे. अशा आवाहनांचा फटका लाखो व्यापाऱ्यांना बसू शकतो. सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी." 'घरून काम' करण्याच्या सूचनेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. "जर घरून काम करण्याचे आवाहन केले जात असेल, तर मग आयपीएल सामने, चित्रपटगृहे आणि हॉटेल्सबाबत नेमकी भूमिका काय आहे? त्यावर सरकारकडून कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण दिलेले नाही. घरून कामामुळे वीज आणि इंटरनेट सेवांवर ताण येणार आहे, याचाही सरकारने विचार केलेला दिसत नाही," असे ते म्हणाले. राजकीय आरोप-प्रत्यारोपांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा भाजपने देशातील गंभीर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन आदित्य ठाकरे यांनी यावेळी केले.

# ना. पंकजाताई मुंडे यांची 'ईव्ही' मधून मंत्रालयात एंट्री ; पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद

■ मुंबई वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास केला. इंधन बचतीचा संदेश देत त्यांनी इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. सध्याची जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करून इंधन बचतीचे आवाहन केले होते, त्यांच्या आवाहनाला सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सर्व मंत्री कार्यालय व विभागांना इंधन बचतीचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज रामटेक निवासस्थान ते मंत्रालय पर्यंतचा प्रवास 'ईव्ही' कारने केला. तसं पाहिलं तर पर्यावरण मंत्री या नात्याने ना. पंकजाताई हया सुरवातीपासूनच ईव्ही वाहन वापरत होत्या, निवासस्थान ते मंत्रालय, विधानभवन असा प्रवास त्या याच ईव्ही मधून करतात. पंतप्रधानांच्या आवाहनानुसार याच वाहनातून प्रवास करत त्यांनी इंधन बचतीबरोबरच प्रदुषण मुक्तीचाही संदेश दिला आहे.



## संपादकीय

# हंगेरीतील सत्तांतराचा अमेरिकेला धक्का

ऑर्बन यांनी विरोधकांना व्यक्ती म्हणून नव्हे, तर व्यवस्था म्हणून उभे केले. ते केवळ युरोपियन महासंघाचे केंद्र नव्हते, तर एका संपूर्ण व्यवस्थेचे प्रतीक होते; मात्र २०२२ नंतर परिस्थिती बदलू लागली.

युरोपमधील हंगेरी या छोट्या देशातील ताज्या निवडणूक निकालांचे पडसाद केवळ त्या देशापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्याचे प्रतिध्वनी थेट अमेरिकेपर्यंत ऐकू येत आहेत. पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांचा पराभव हा जागतिक राजकारणातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेक प्रभावशाली नेते ऑर्बन यांचे उघड समर्थक राहिले आहेत. हा पराभव काय सांगतो?

हंगेरीचे मावळते पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांनी सत्तेचा वापर करून माध्यमे, न्यायव्यवस्था आणि निवडणूक यंत्रणा यांच्यावर प्रभाव टाकत जवळपास सोळा वर्षे सत्तेवर पकड कायम ठेवली. त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्या राजकीय कार्यक्रमपत्रिकेत साम्य आढळते, ही बाबही अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. ट्रम्प यांनी ऑर्बन यांच्या पुनर्निवडीसाठी जोरदार पाठिंबा दर्शवला होता. अगदी इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवरही अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांना हंगेरीच्या बुडापेस्ट येथे पाठवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तथापि, ऑर्बन यांच्या पराभवाने वेगळेच वास्तव अधोरेखित केले. जागतिक संघर्षांच्या छायेत परदेशातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्याची अमेरिकेची क्षमता मर्यादित होत चालली आहे. या निकालाचे व्यापक परिणाम होणार हे निश्चित. ऑर्बन हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचे युरोपमधील निकटचे सहयोगी मानले जात होते. त्यांनी युरोपीय महासंघाकडून युक्रेनला मिळणाऱ्या मदतीत अडथळे निर्माण केले होते. त्यांच्या पराभवामुळे युरोपीय राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या निकालाचे स्वागत अमेरिकेतील दोन्ही प्रमुख पक्षांकडून करण्यात आले. काही नेत्यांनी तर इतर लोकशाही देशांच्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याच्या धोरणावरच टीका केली. लोकशाही व्यवस्थेत अखेरीस जनतेचीच भूमिका निर्णायक ठरते, असा व्यापक संदेश यावरुन जातो. राजकीय तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या अस्थिर जागतिक वातावरणात सत्ताधाऱ्यांविरोधातील असंतोष वाढत आहे. आर्थिक अडचणी, महागाई आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे मतदार बदलाची मागणी करत आहेत. हंगेरीतील निकाल याच व्यापक प्रवाहाचा भाग मानला पाहिजे.

लोकशाहीमध्ये कुणीही 'अपराजित' नसतो. वेळ आल्यास जनता सत्तांतर घडवून आणते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ट्रम्प आणि पुतीन यांच्यासारख्यांचा पाठिंबा, हंगेरीतील माध्यमे ताब्यात, सत्तेचे केंद्रीकरण असे सर्व प्रकार असतानाही जनतेने ऑर्बन यांची १६ वर्षांची सत्ता उलथवून टाकली. जनतेला गृहीत धरणे चुकीचे असते, हा संदेश हंगेरीच्या निवडणुकीने जगाला दिला. हंगेरीच्या राजकारणात नुकत्याच घडलेल्या सत्तांतराने युरोपीय राजकीय पटावर एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जवळपास १६ वर्षे सत्तेवर असलेल्या व्हिक्टर ऑर्बन यांच्या नेतृत्वाखालील फिडेज या पक्षाला पराभवाचा धक्का बसणे हा केवळ निवडणूक निकाल नसून, दीर्घकाळ एकाच विचारसरणीच्या वर्चस्वाला मिळालेला जनतेचा प्रतिसाद मानावा लागेल. ऑर्बन यांच्या कारकिर्दीमध्ये 'बिनउदारमतवादी लोकशाही' ही संकल्पना पुढे आली. राष्ट्रवाद, सांस्कृतिक परंपरा आणि स्थलांतरविरोधी भूमिका या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली राजकीय घडी बसवली. युरोपीय महासंघासोबतचे त्यांचे संबंध अनेकदा तणावपूर्ण राहिले. न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप, माध्यम स्वातंत्र्यावरील निर्बंध आणि नागरी स्वातंत्र्यांवरील मर्यादा यामुळे हंगेरीवर वारंवार टीका झाली; मात्र देशांतर्गत पातळीवर त्यांनी आर्थिक स्थैर्य, रोजगार आणि पारंपरिक मूल्यांचे रक्षण यांची मांडणी करून जनाधार टिकवून ठेवला. या निवडणुकीत विरोधकांनी प्रथमच एकसंध आघाडी उभी केली. विविध विचारधारांचे पक्ष एकत्र येऊन सत्ताधारी व्यवस्थेविरुद्ध लढले. या नव्या राजकीय पर्यायाने मतदारांना 'पर्याय' उपलब्ध करून दिला, जो गेल्या अनेक वर्षांमध्ये नव्हता.

दीर्घकाळ एकाच पक्षाच्या वर्चस्वामुळे निर्माण झालेली अस्वस्थता, सत्तेचे केंद्रीकरण आणि पर्यायांचा अभाव या घटकांनी मिळून बदलाची पायाभरणी केली. सत्ताधाऱ्यांनी माध्यमे आणि संस्थांवर प्रभाव टाकला असला, तरी डिजिटल माध्यमे आणि सामाजिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्ममुळे माहितीचे पर्यायी स्रोत उपलब्ध झाले. यामुळे जनमत तयार करण्यात पारंपरिक माध्यमांच्या प्रभावाला मर्यादा आल्या. नव्या सत्ताधाऱ्यांसमोर आव्हानांची कमतरता नाही. आर्थिक स्थैर्य टिकवणे, युरोपीय महासंघाशी संबंध सुधारणा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही संस्थांवरचा विश्वास पुनर्स्थापित करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असेल. विविध विचारसरणींच्या आघाडीला एकत्र ठेवणे हेही सोपे काम नाही. अंतर्गत मतभेद आणि धोरणात्मक विसंगती यामुळे सरकार अस्थिर होण्याची शक्यता कायम राहील. हंगेरीचा हा राजकीय बदल जागतिक पातळीवरही महत्त्वाचा संदेश देतो. लोकशाहीमध्ये कितीही मजबूत वाटणारी सत्ता असली, तरी जनतेचा कौल अंतिम असतो. राष्ट्रवाद आणि केंद्रीकरणाच्या राजकारणाला मर्यादा असतात आणि वेळोवेळी लोकशाही स्वतःचे संतुलन स्वतः साधते, हे या निकालाने अधोरेखित केले. हंगेरीतील सत्तांतर केवळ एका देशापुरते मर्यादित न राहता युरोप तसेच जगातील लोकशाही प्रक्रियेतील बदलत्या प्रवाहांचे प्रतिबब आहे. आता खऱ्या अर्थाने कसोटी नव्या सत्ताधाऱ्यांची आहे. ते बदलाची आशा पूर्ण करतात की पुन्हा जुन्याच चक्रात अडकतात, हे येणारा काळच ठरवेल. सर्वात सूक्ष्म घटक म्हणजे राष्ट्रवादाची पुनर्रचना. वर वर पाहता हा निकाल उदारमतवादाचा विजय वाटू शकतो; पण वास्तव अधिक गुंतागुंतीचे आहे. तिस्झा पक्षाचे नाव आणि 'मॅग्यार' हे आडनाव हंगेरीच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळखीशी घट्ट जोडलेले आहे. म्हणजेच ऑर्बन यांची व्यवस्था संपवणारी शक्ती बाहेरून आली नव्हती, तर हंगेरीच्या आतून, त्याच राष्ट्रवादी भावनेतून उभी राहिली. हंगेरीतील सत्तांतराचा शेवटचा टप्पा समजून घेताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते.

# 'भाजपसाठी मेलोडी, तर जनतेसाठी मिझरी'; मल्लिकार्जुन खर्गे यांचा पंतप्रधान मोदींवर घणाघाती आरोप

## वाढती महागाई, बेरोजगारी, पेपर लीक आणि रुपयाच्या घसरणीवरून काँग्रेस आक्रमक

**नवी दिल्ली ( वृत्तसंस्था ):**



देशात वाढती महागाई, बेरोजगारी, पेपर लीक, घटणारी गुंतवणूक आणि रुपयाची घसरण या मुद्द्यांवरून काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. "देशाची अर्थव्यवस्था संकटात असतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले पीआर स्टंट सुरूच ठेवून आहेत," अशी तीव्र टीका काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि पंतप्रधान मोदी यांच्या सोशल मीडियावरील व्हिडिओचा संदर्भ देत, "लूट ही भाजपसाठी 'मेलोडी' (मधुर) आहे, पण जनतेसाठी 'मिझरी' (कष्टप्रद) आहे," असे पोस्टर शेअर करत खर्गे यांनी भाजपवर निशाणा साधला. सिलिंडर आणि इंधन दरवाढीवरून टीका

मल्लिकार्जुन खर्गे यांनी आकडेवारी जाहीर करत केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, २०१४ मध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ४१४ रुपये होती, ती आता १२१ टक्क्यांनी वाढून ९१५.५ रुपयांवर पोहोचली आहे. तसेच व्यावसायिक सिलिंडरचे दर १५४ टक्क्यांनी वाढून १,२४१ रुपयांवरून थेट ३,१५२ रुपये झाले आहेत. गेल्या १२ वर्षांत केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील कर तसेच उत्पादन शुल्काच्या माध्यमातून जनतेकडून ४३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वसूल केल्याचा आरोप त्यांनी केला. सीएनजी, दूध, ब्रेड आणि औषधांच्या किमतीही सातत्याने वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**बेरोजगारी आणि पेपर लीकचा मुद्दा ऐरणीवर**

देशातील बेरोजगारीच्या भीषण वास्तवाकडे लक्ष वेधताना खर्गे म्हणाले की, मार्च २०२६ मधील आ कडेवारीनुसार, १५ ते २९ वयोगटातील तरुण बेरोजगारीचा दर १५.२ टक्क्यांवर पोहोचला असून, हा गेल्या नऊ महिन्यांतील उच्चांक आहे. भाजपच्या १० वर्षांच्या राजवटीत ९० वेळा विविध परीक्षांचे पेपर लीक झाले आहेत. यामुळे सुमारे ९ कोटी तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त झाले असून शासकीय भरती प्रक्रियेची विश्वासार्हता पूर्णपणे संपुष्टात आली आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

**आर्थिक विषमता वाढल्याचा दावा**

मोदी सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात प्रत्येक भारतीयावरील सरासरी कर्ज ११ पटीने वाढले असल्याचा दावा काँग्रेस अध्यक्षांनी केला. "दुसरीकडे, देशातील २२९ बड्या उद्योगपतींची आणि २६ नवीन अब्जाधीशांची संपत्ती ९७.५० लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. भारतीय रुपया ९६.९० च्या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर घसरला असून, परकीय चलन साठा ३८ अब्ज डॉलर्सने घटला आहे. या आर्थिक संकटामुळेच आज देशातील ८० कोटी जनतेला ५ किलो मोफत रेशनवर अवलंबून राहावे लागत आहे," असा टोलाही खर्गे यांनी शेवटी लगावला.

# एसटी प्रवाशांना तूर्तास दिलासा!

## भाडेवाढ लांबणीवर; डिझेलचे दर स्थिर झाल्यानंतरच निर्णय होण्याची शक्यता

**मुंबई ( वृत्तसंस्था ):**



आं त रराष्ट्रीय स्तरावरील घडामोडी आ णि वाढत्या डिझेलच्या किमतींमुळे एस टी महामंडळ मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहे. डिझेलच्या वाढत्या किमती पाहता भाडेवाढ करण्याशिवाय एसटी महामंडळाकडे पर्याय उरलेला नाही. मात्र, प्रवाशांचा संभाव्य संताप आणि परिस्थितीचा विचार करता ही भाडेवाढ तूर्तास न करता, डिझेलचे दर स्थिर झाल्यानंतरच ती लागू केली जाईल, अशी शक्यता एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

**महामंडळाला दररोज १ कोटींचा तोटा**

पंतप्रधान मोदींचा काटकसरीचा सल्ला

सध्या अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधनाचा तुटवडा जाणवू लागला असून दररोज किमती वाढत आहेत. या वाढत्या इंधन किमती, कर्मचाऱ्यांचे ख र्च आणि सुट्या भागांच्या वाढलेल्या किमतींमुळे गेल्या वर्षीच एसटी महामंडळाने १४. ९ ५ टक्के भाडेवाढ केली होती. या न व्या आर्थिक संकटामुळे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भाडेवाढीचा प्रस्ताव असल्याचे जाहीर केले असले, तरी डिझेलचे दर स्थिर झाल्यावरच अंतिम निर्णय होईल. भाडेवाढ न केल्यास महामंडळ दररोज तब्बल १ कोटी रुपयांच्या तोट्यात चालत असल्याने एसटीचे आर्थिक चक्र रुतण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या इंधन टंचाईच्या काळात काटकसरीचा सल्ला दिला आहे.

**'दरवाढ सम स्वरूपात करा'; सुट्या पैशांचा वाद टाळण्यासाठी मागणी**

दुसरीकडे, महाराष्ट्र राज्य एसटी का मगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी महामंडळाकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे. भविष्यात होणारी भाडेवाढ ही विषम स्वरूपात (उदा. २२ किंवा २३ रुपये) न करता ती 'सम स्वरूपात' करावी, जेणेकरून सुट्या पैशांवरून वाहक आणि प्रवाशांमधील गोंधळ व दमछाक टळेल. स्वच्छता अधिभारात २ रुपयांची वाढ केल्यामुळे वाहकांना सुट्या पैशांसाठी सध्या मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा त्रास दूर करण्यासाठी आगामी तिकीट दरवाढ ही थेट ५ रुपयांच्या पट्टीतच (५, १०, १५, २० अशी) करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. कामगार संघटनेने प्रवाशांच्या सोयीसोबतच कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे मुद्देही उपस्थित केले आहेत. राज्य परिवहन कर्मचाऱ्यांचा थकीत महागाई भत्ता, घरभाडे भत्ता तसेच ९ टक्के वेतनवाढीच्या दरातील फरक तातडीने देण्यात यावा, अशी आग्रही मागणी संदीप शिंदे यांनी केली आहे.



# शिवहार लहाने आदर्श शिक्षण सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**(पुरंदर, पुणे)**

आचार्य अत्रे सांस्कृतिक सभागृह, सासवड, ता.पुरंदर जि. पुणे येथे रविवार दि.१७ मे २०२६ रोजी अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे जिल्हा कार्यवाह, शैक्षणिक कायद्याचे अभ्यासक, म. ए. सो. वाघीरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सासवड येथील विद्यार्थी प्रिय व उपक्रमशिल शिक्षक शिवहार लहाने यांचा शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याबद्दल आदर्श शिक्षण सेवारत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशनचे कार्य प्रेरणादायी असून, समाजात सामाजिक भान जपणारी ही संघटना कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन चित्रपट महामंडळाचे भोसले यांनी केले. संस्थापक-अध्यक्ष अप्पासाहेब भांडवलकर, प्रदेशाध्यक्ष राहुल भोंडे, अमोल लोंढे, माजी उपनगराध्यक्ष सुहास लांडगे, विजय वढणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी अणुऊर्जाच महत्त्वाची

## पायाभूत सुविधांसह सवलती देण्याची राज्याची ग्वाही



**मुंबई ( वृत्तसंस्था ):**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डेटा सेंटर्स, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे आगामी काळात स्थिर व अखंड विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ सौर आणि पवन ऊर्जेवर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसून, अणुऊर्जा (न्यूक्लिअर एनर्जी) हीच भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच, महाराष्ट्र या क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहनही त्यांनी केले. 'यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया' अंतर्गत आयोजित न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूट आणि युएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप फोरमच्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते.

**महाराष्ट्र केवळ 'ग्राहक' नव्हे, तर 'जागतिक निर्यात केंद्र' बनणार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. खासगी क्षेत्राचा सहभाग, शांती फ्रेमवर्कअंतर्गत सुधारणा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. आगामी अनेक दशकांत भारतात विजेची मागणी वेगाने वाढणार असून महाराष्ट्र हा त्यातील सर्वात मोठा औद्योगिक घटक ठरणार आहे. भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी असेल. महाराष्ट्राला केवळ आयात केलेल्या अणुभट्ट्यांचा ग्राहक म्हणून नव्हे, तर न्यूक्लिअर उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा आमचा निर्धार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**उद्योग उभारणीसाठी विशेष पॅकेज आणि सवलती**

अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात न्यूक्लिअर उत्पादन व प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतल्यास राज्य सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. यासाठी औद्योगिक जमीन, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, संशोधन सहकार्य आणि विशेष उत्पादन क्लस्टर उभारणीसाठी राज्य सरकार मदत करेल. याशिवाय, सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योगांसाठी विशेष अनुदान आणि सवलती देण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारा 'शक्तीपीठ महामार्ग' रद्द करा

## कोल्हापूर आणि वसमतमध्ये तीव्र जनआक्रोश

## मंत्र्यांच्या पंचतारांकित हॉटेलसाठी सातारा जिल्ह्यात वळसा ; शेतकरी नेते राजू शेट्टी यांचा खळबळजनक आरोप




**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

"शक्तीपीठ महामार्ग हा प्रकल्प जरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील असला, तरी तो शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारा आहे. या महामार्गाविरोधातील तीव्र लढा पाहून मुख्यमंत्री स्वतःच हा प्रकल्प रद्द करण्याची घोषणा करतील," असा विश्वास काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी व्यक्त केला. कोल्हापुरात आयोजित 'शक्तीपीठ' विरोधी संघर्ष समितीच्या भव्य मेळाव्यात ते बोलत होते. या महामार्गाविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट असून आता हा लढा अधिक आक्रमक करण्याचा निर्धार संघर्ष समितीने केला आहे.

■ **९ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा**

या आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करताना सतेज पाटील म्हणाले की, १८ ते २२ मे दरम्यान तालुकास्तरावर मेळावे घेतले जातील. तसेच संबंधित प्रांताधिकाऱ्यांकडे अधिकृत हरकत पत्रे सादर केली जाणार आहेत. या आंदोलनाचा मुख्य टप्पा म्हणून ९ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य 'जनआक्रोश' मोर्चा काढण्यात येईल. या मोर्चाची ताकद पाहून सरकारला हा प्रकल्प रद्द करावाच लागेल, असे त्यांनी निक्षून सांगितले.


■ **मंत्र्यांच्या फायद्यासाठी महामार्गाला वळसा : राजू शेट्टी**

या मेळाव्यात बोलताना शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर गंभीर आरोप केले. "शक्तीपीठ महामार्ग आधी सातारा जिल्ह्यातून जाणार नव्हता. मात्र, सत्ताधारी पक्षाच्या एका मंत्र्यांच्या पंचतारांकित हॉटेलला फायदा पोहचवण्यासाठी हा महामार्ग सातारा जिल्ह्यात वळवण्यात आला आहे. या भागामध्ये मंत्र्यांनी मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी केल्या आहेत," असा खळबळजनक आरोप शेट्टी यांनी केला. दुसरीकडे, अजित पवार गटाचे माजी आमदार के. पी. पाटील आणि बिद्री कारखान्याचे उपाध्यक्ष मनोज फराकटे यांनीही पक्षाची भूमिका बाजूला ठेवत, बोरवडे गावासह इतर भागातील शेतकऱ्यांची हानी लक्षात घेऊन शक्तीपीठ महामार्गाला आपला विरोध कायम राहील, असे जाहीर केले आहे.

■ **वसमतमध्ये घुमला नाराजीचा आवाज: 'जीव देऊ पण जमीन देणार नाही'**

हिंगोली: नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथेही हजारो शेतकरी, महिला आणि तरुणांनी एकत्र येत तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. "आमच्या हक्काच्या सुपीक जमिनीवर सरकारचा बुलडोझर चालू देणार नाही, प्रसंगी जीव देऊ पण जमीन देणार नाही," अशा संतप्त घोषणांनी वसमत शहर दणाणून गेले होते. सुपीक जमिनी वाचवण्यासाठी शेतकरी कोणत्याही थराला जाण्यास तयार असल्याचे या मोर्चातून स्पष्ट झाले.

# राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणासाठी महागावच्या महिला सरपंचांची प्रशिक्षक म्हणून निवड



**महागाव :** यवतमाळ जिल्ह्यातील महागाव येथील सरपंच सौ. जयश्री राठोड यांची हैदराबाद येथे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील "Championing Change : Empowering Women Leaders in Local Governance" या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमासाठी Trainer म्हणून निवड करण्यात आली आहे.

हा पाच दिवसीय राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम १८ ते २२ मे दरम्यान NIRDPR, राजेंद्रनगर, हैदराबाद येथे पार पडत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला नेतृत्व सशक्त करण्याच्या उद्देशाने देशभरातून निवडक महिला प्रतिनिधींना या प्रशिक्षणासाठी संधी देण्यात आली आहे.

एका ग्रामीण भागातील महिला सरपंच म्हणून राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षक म्हणून निवड होणे ही महागावसह यवतमाळ जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या निवडीबद्दल प्रा.सौ. जयश्री सुनील राठोड यांनी आपल्या यशाचे श्रेय वरिष्ठ मार्गदर्शक, सहकारी, कुटुंबीय आणि गावातील मायबाप जनतेला दिले आहे. "जनतेचा विश्वास, प्रेम आणि आशीर्वाद यामुळेच हा मान मिळाला असून पुढेही महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि समाजहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करत राहीन," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत पुस्तके

## विद्यार्थी संख्या गळती रोखण्यासाठी प्रशासनाचे पाऊल

**सातारा - वृत्तसंस्था**

इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीमध्ये शिकणारे कोणतेही मूल पाठ्यपुस्तकांपासून वंचित राहू नये आणि पुस्तकांअभावी त्यांच्या शिक्षणात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके योजना राबविण्यात येत आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मोफत देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण व अर्थ समितीच्या सभापती सौ. तेजस्विनी कदम यांनी दिली.

या योजनेंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खाजगी अनुदानित शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण मोफत करण्यात येणार आहे.

## सौ. तेजस्विनी कदम; शाळेच्या पहिल्याच दिवशी होणार वाटप

*"प्राथमिक शाळांमध्ये दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात येत आहे. शाळांची पटसंख्या वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिली ते इयत्ता आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. गळतीचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे."*

*- सौ. तेजस्विनी कदम, सभापती शिक्षण व अर्थ समिती*



# भरदिवसा जिजामाता उद्यानात अश्लील प्रकारांचा सुळसुळाट

## पोलीस व नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

**परळी | प्रतिनिधी :**

शहरवासीयांना विरंगुळा मिळावा, लहान मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध व्हावी आणि महिलांना निवांत वातावरणात वेळ घालवता यावा या उद्देशाने उभारण्यात आलेले परळीतील जिजामाता उद्यान सध्या काही युवक-युवतींच्या अश्लील वर्तनामुळे चर्चेचा विषय बनले आहे. भरदिवसा झाडाझुडपांच्या आडोशाला बसून सुरू असलेल्या अशोभनीय प्रकारांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दुपारच्या वेळेत उद्यानात, ट्युशन, क्लासेस, शाळा-कॉलेज बुडवून येणाऱ्या अल्पवयीन मुलामुलींची संख्या वाढत असून, कोणतीही देखरेख नसल्याने येथे खुलेआम अश्लील चाळे सुरू असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. यामुळे उद्यानात येणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, परिसरातील दुकानदारांचे नोकर व कामगार दुपारच्या सुट्टीत जेवणासाठी उद्यानात येतात. मात्र, उद्यानातील वाढत्या गैरप्रकारांमुळे त्यांनाही अस्वस्थ वातावरणाचा सामना करावा लागत आहे. "कुटुंबासोबत उद्यानात जाणेही अवघड झाले आहे," अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

नागरिकांच्या मते, नगरपालिकेकडून उद्यानात कोणतीही प्रभावी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आलेली नाही. उद्यान सुरू असताना महिला व पुरुष कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक नियुक्त करून अशा प्रकारांना त्वरित आळा घालण्याची मागणी होत आहे. तसेच पोलीस प्रशासनानेही जिजामाता उद्यान परिसरात दिवसातून किमान दोन वेळा गस्त घालून परिस्थितीवर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी जोर धरत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागातील सार्वजनिक उद्यानाची अशी अवस्था होत असताना प्रशासन मात्र दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. आता नगरपालिका व पोलीस प्रशासन या गंभीर प्रकाराची दखल घेऊन ठोस कारवाई करणार का? असा प्रश्न परिसरात उपस्थित केला जात आहे.

## लोकजागर

# लोक सेवार्थ : माणुसकीचे 'एहसास' देणारे विश्व



अनेकदा बस स्थानक, रेल्वे स्टेशन, हॉस्पिटल आदी ठिकाणी फिरताना आपल्याला मतिमंद मुले दृष्टीस पडतात. त्यांची अवस्था पाहून आपल्याला वाईट वाटते, सहानुभूतीही वाटते. पण, त्यांची जबाबदारी घेण्याचे धाडस आपल्यात नसते. त्यांचे नेमके काय होत असेल, हा प्रश्न मात्र आपल्याला नेहमी पडतो. अशा निराधार मतिमंद मुलांचा मायेने सांभाळ करणारी साताऱ्यातील अशीच एक संस्था म्हणजे एहसास मतिमंद मुलांचे बालगृह, सातारा. अनेक अनाथ मतिमंद मुलांचे संगोपन करणारी, त्यांच्या जीवनात आशेचा किरण पेरणारी एक संस्था.

मतिमंद मुलं म्हटली की समाज त्यांची चेष्टा करतो. त्यांच्या पालकांनाही ती बोजा वाटू लागतात. मग बऱ्याचदा पालकच त्यांना एखाद्या ठिकाणी सोडून त्यांचे निघून जातात. अशाच निराधार अनाथ मुलांच्या संगोपनाची जबाबदारी "एहसास'गेल्या 13 वर्षांपासून घेत आहे. एहसाससाठी आपलं सर्वस्व अर्पण करणारे संजय कांबळे सांगतात, ""समाजासाठी काहीतरी करायचंय, हा निर्धार आम्ही पक्का केला होता. त्यावेळी अशा लोकांसाठी काहीतरी करावं, जे आधाराशिवाय जगू शकत नाहीत. दरम्यान, समाजातील मतिमंद मुलांची अवस्था बघितली. त्यांची असहाय्यता आम्हाला बेचैन करायची. म्हणूनच आम्ही निर्णय घेतला अनाथ मतिमंद मुलांसाठी बालगृह सुरू करायचं. पण, आर्थिक अडचणी होत्या. सुरवातीला स्वतःच्या घरी 2006 मध्ये एहसास सुरू केले. सुरुवातीला पाचच मुले होती; परंतु आजुबाजूच्या लोकांना त्रास होऊ नये म्हणून साताऱ्याजवळ वळसे येथे एक जागा भाडेतत्त्वावर घेतली. तिथं "एहसास' सुरू केले. सध्या इथे 50 मुले आहेत. त्यांच्या सेवेसाठी सुमारे 20 कर्मचारी दिवसरात्र झटत असतात. त्यांच्या निःस्वार्थ कष्टामुळेच हे काम चालू आहे. पोलिसांना राज्यभरात कुठे अशी अनाथ मतिमंद मुले सापडली की ते "एहसास'ला कळवतात. मग आम्ही न्यायालयातील कायदेशीर बाबींची पूर्तता करून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घेतो. अनेकजण देणग्या देतात, काहीजण इतर मार्गांनी मदत करतात. त्यातून बराच हातभार लागतो.''

"एहसास'मध्ये सामान्य माणसाप्रमाणे या मुलांचे दिवसाचे वेळापत्रक ठरलेलं आहे. ही मुले रोज योगा करतात, प्रार्थना-गाणी म्हणतात, वाचन करतात, चित्रे काढतात, खेळ खेळतात, वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होतात, स्वतःची कामं स्वतः करतात, त्यांच्यात येणाऱ्या नवीन सदस्यांना सामावून घेतात. त्यांना व्यवस्थित शिकवलं; तर काही अपवाद वगळता एक सामान्य माणूस जे करू शकतो ते सर्व स्वतःची कामे ही मुलं करू शकतात.

अनाथ मतिमंद मुलांना सामान्य आयुष्य जगण्यासाठी "एहसास'मध्ये सर्वतोपरी प्रयत्न इथे केले जातात. डॉक्टर, नर्स, शिक्षिका, मदतनीस, आचारी असे साधारणपणे 20 जण या मुलांची सेवासुश्रुषा करतात. मुलांसाठी खास वेळापत्रक बनवलंय... ज्यात नियमित व्यायाम, योगाभ्यास, ध्यान आदी उपक्रमांच्या माध्यमातून त्यांची शारीरिक, मानसिक जडणघडण करण्याचे प्रयत्न केले जातात. त्यांच्यासाठी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. सर्वच सण, उत्सव साजरे होतात. खासकरून रक्षाबंधनला इथं अनेक मुली येतात. अनेकजण आपले वाढदिवस "एहसास'मध्ये येऊन साजरे करतात. मुलांना भेटवस्तू देतात.

"एहसास'मध्ये मुलांतील चांगल्या गोष्टी हेरून त्यांचा विकास घडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यामुळेच इथली मुले सामान्य मुलांच्या बरोबर बऱ्याच स्पर्धांमध्ये सहभागी होतात. बक्षिसेही मिळवतात; मग ती चित्रकला स्पर्धा असूद्या नाहीतर डान्स स्पर्धा... ही मुलं आपले अस्तित्व सिद्ध करतात. पण, त्यासाठी "एहसास'ला खुप व्यापक काम करावे लागते. कारण अनाथ मतिमंद मुलांपैकी काही बालके अपंग, अंध किंवा कर्णबधिरही आहेत. त्यामुळे या प्रत्येकासाठी वेगवेगळ्या पद्धतीने काम करावे लागते. अगरबत्ती, पणत्या बनवणे इतकेच काय शेतीदेखील ही मुले उत्तमरित्या करू शकतात.

# शून्यातून विश्व : ग्रामीण तरुण बनला उद्योजक

जेमतेम शिक्षण व आर्थिक परिस्थिती बिकट, अशा परिस्थितीत गावगाडा हाकायचा... त्यात गावही लहान... त्यामुळे रोजगाराच्या संधीचा प्रश्नच नव्हता. पण, मोठे स्वप्न, जिद्द व मेहनतीच्या बळावर पुंगळा (ता. जिंतूर) येथील पांडुरंग बाळाभाऊ जगताप यांनी गट्टूचा उद्योग उभारून स्वतःची उन्नती करत सहा मजुरांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.

शिक्षण बेताचेच असलेतरी उद्योजक बनण्याचे स्वप्न ते उराशी बाळगून असल्याने जगताप यांनी नोकरीच्या मागे न लागता उदरनिर्वाहासाठी सुरवातीला ठेकेदारीने घरे बांधणीचा व्यवसाय सुरू केला. परंतु, त्यात अपेक्षित यश मिळत नव्हते. त्यामुळे खचून न जाता त्यांनी शासनाच्या



पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेंतर्गत जिल्हा खादी ग्रामोद्योग (परभणी) यांच्यामार्फत २०१४-१५ या वर्षी 'गणेश सिमेंट गट्टू' निर्मितीचा उद्योग सुरू केला. त्यासाठी जिंतूर येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेने त्यांना वीस लाख रुपयांचा कर्जपुरवठा केला. यामधून मशनरी खरेदी, शेड बांधकाम, गोदाम, साठवणूक, विद्युतपुरवठा, कच्चे साहित्य खरेदी व मजुरी आदींसाठी अकरा लाखांची गुंतवणूक करून नऊ लाख रुपये खेळते भांडवल ठेवले व उत्पादन सुरू केले.

व्यवसायात लवकरच जम बसल्याने पहिल्या दोन वर्षांत (२०१५ व २०१६) खर्च वजा जाता अनुक्रमे दोन ते तीन लाख रुपये नफा झाला. त्यानंतरच्या दोन वर्षांत प्रत्येकी अडीच लाख रुपये पदरी पडले. तर सरत्या वर्षात तीन लाख रुपये नफा मिळाला. त्यातून बँकेची संपूर्ण कर्जफेड केली. गट्टू टिकाऊ असल्याने अलीकडे ग्रामपंचायतींतर्गत सिमेंट रस्त्यांची कामे करण्याऐवजी 'गट्टू'चे रस्ते करण्यावर भर देत असल्याने तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींकडून गट्टूंची मागणी केली जात आहे. शिवाय विविध समाज मंदिरे, धार्मिक स्थळांच्या ठिकाणीदेखील बांधकामासाठी गट्टू उपयोगात आणल्या जात आहेत. यावरून जगताप यांच्या व्यवसायाला भरभराटीचे दिवस आल्याचे चित्र आहे.या व्यवसायाकरिता जिल्हा ग्रामोद्योग व भारतीय स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांनी मोलाची मदत केल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. सिमेंट गट्टूच्या एका ब्रासमागे वीस टक्के निव्वळ नफा शिल्लक राहतो. त्यामुळे बेरोजगार युवकांनी नोकरीच्या मागे न धावता केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वतः उद्योजक बनावे.

**- संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, गुरुवार 21 मे 2026
Last page

## चौकशी होऊन 10 दिवस झाले, तरी अहवाल अद्याप प्रलंबित!

# पीडित मुंडे कुटुंबाची न्यायासाठी हेळसांड

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी शहरातील गित्ते हॉस्पिटल या रुग्णालयात उपचारा दरम्यान गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, संबंधित डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच ही घटना घडल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे. तसेच बाळाचा मृत्यू झाल्यानंतरही तब्बल २२ तास मृत गर्भ महिलेच्या पोटात ठेवून पैशांची उकळपट्टी करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदार वैजनाथ मुंडे यांनी केला आहे. दरम्यान चौकशीचा सोपस्कार पार पडला मात्र अद्याप आहवाल नाही, कोणतीही कारवाईही नाही. त्यामुळे कुटुंबाची न्यायासाठीही हेळसांड होत आहे.

सौ.दीप्ती वैजनाथ मुंडे यांच्यावर गर्भधारणेपासून संपूर्ण उपचार परळी येथील गित्ते



हॉस्पिटलमध्ये डॉ. कल्पना सचिन गित्ते यांच्या देखरेखीखाली सुरू होते. उपचारादरम्यान डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाला.तसेच बाळमातेच्या जीवाशी खेळण्यात आले. अतिशय गंभीर प्रकरणातही गांभीर्य घेतले जात नसेल तर ते दुर्दैवी असुन न्यायासाठीही आमची हेळसांडच होत आहे असा आरोप मुंडे कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी दीप्ती मुंडे व त्यांचे पती



वैजनाथ मुंडे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीची गंभीर दखल घेत प्रशासनाने तातडीने चौकशी समिती नेमली असून, समितीने गित्ते हॉस्पिटलला भेट देत संबंधित कागदपत्रे व उपचार प्रक्रियेची माहिती घेतली आहे. मात्र, चौकशी होऊन आठ ते दहा दिवस उलटूनही अद्याप अहवाल पीडित कुटुंबाला देण्यात आलेला नसल्याने कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रकरण गंभीर असताना अहवाल देण्यास विलंब का होत आहे? असा सवालही मुंडे कुटुंबीयांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा चौकशी अहवाल तात्काळ जाहीर करावा आणि दोषी असणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वैजनाथ मुंडे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# अंबाजोगाई महिला मंडळाच्या वतीने बाई, बेटी, जमाई संमेलन संपन्न




**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

आंबेजोगाई आर्यविर मंगल कार्यालयात माहेश्वरी महिला मंडळ यांच्या वतीने अंबाजोगाई शहरातील मुली, जवाई यांना बोलावून भव्य सत्कार आयोजित केला आहे. माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्ष सौ पूनम मुंदडा व सचिव सौ वर्षा रांदड यांनी सकाळी सात वाजल्यापासून पदाधिकार्यासोबत उभ्या राहून आंबेजोगाई येथील बेटीचे स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना ने करण्यात आली व्यासपीठ प्रमुख हैदराबाद निवासी अनुराधा जाजू यांचा सत्कार पूनम मुंदडा यांनी केला. या प्रसंगी सौ माधुरी चितलांगे, बीड जिल्हा सहसचिव, आपल्या भाषणात म्हणालया की बेटीयाला जावई सोबत बोलावून सन्मान केला. एड.श्रीकृष्ण तोष्णीवाल बेटीच्या सन्मानात परिवाराचा सन्मान वाढणारी आमची बहन बेटी मान ठेवणार. तसेच निराधार महिलांना व्यवसायात प्राधान्य देणार असे मत व्यक्त केले.

जीन हातो मे चलना सिखाया,, ऊन हातो को भुला नही चाहिये ही नाटिका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने प्रस्तुत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सो ज्योती राठी यांनी केले

# परळीत "सोमवारी मांस विक्री बंदी" ठरावाच्या अंमलबजावणीची प्रतीक्षा; नागरिकांकडून तात्काळ कारवाईची मागणी

**परळी वैजनाथ :** परळी नगरपरिषदेच्या दि. 30/04/2026 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत "प्रत्येक सोमवारी मांस विक्री बंदी" ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ प्रभू यांच्या पवित्र नगरीच्या भावना जपत घेतलेल्या या निर्णयाचे त्या वेळी शहरभर स्वागत करण्यात आले होते. विशेषतः अधिकमास प्रारंभ झाल्यामुळे भाविकांमध्ये या निर्णयाबद्दल सकारात्मक भावना व्यक्त होत होत्या.

मात्र मंजुरीनंतर दि. 25/05/2026 रोजी चौथा सोमवार येत असतानाही प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत आवश्यक ती प्रभावी कार्यवाही झालेली दिसून येत नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. नागरिकांच्या मते, अद्याप नगर परिषदेमार्फत वृत्तपत्रांमध्ये अधिकृत जाहीर प्रसिद्धी, व्यापाऱ्यांना स्पष्ट नोटीस, लाऊडस्पीकरद्वारे जनजागृती किंवा सातत्यपूर्ण सूचना देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अनेक भागांमध्ये सोमवारची मांस



विक्री सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

याबाबत वेळोवेळी नगर परिषद प्रशासन, मुख्याधिकारी, नगराध्यक्षा, गटनेते तसेच नगरसेवक-नगरसेविका यांना अभिनंदन संदेश, निवेदने, WhatsApp संदेश, ईमेल व स्मरणपत्रांद्वारे अंमलबजावणीची मागणी करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष पातळीवर अधिक काटेकोर उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

परळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी पदभार स्वीकारताना "विकास पर्व 2.0" ची घोषणा करत शहराच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प मांडला होता. त्याच अनुषंगाने धार्मिक भावना, जनभावना आणि परळीच्या पवित्रतेशी संबंधित निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

परळी हे पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र असल्यामुळे सोमवारचा दिवस भाविकांसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने तात्काळ स्पष्ट आदेश, जनजागृती मोहीम, पोस्टर, जाहीर सूचना आणि आवश्यक प्रशासनिक कारवाई करून सर्वानुमते मंजूर झालेल्या ठरावाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी शहरातील भाविक व नागरिकांकडून केली जात आहे.

श्री वैद्यनाथ प्रभू यांच्या पवित्र नगरीच्या सन्मानासाठी घेतलेला निर्णय केवळ कागदापुरता न राहता प्रत्यक्षात काटेकोरपणे राबविण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# एकत्र निवडणुकांनी 7 लाख कोटी वाचतील: पी. पी. चौधरी

## संसदीय समितीच्या अध्यक्षांनी मांडले गणित

**नवी दिल्ली :** लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्यास भारताचे सुमारे ७ लाख कोटी रुपये वाचू शकतात आणि संभाव्यतः सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) १.६ टक्क्यांनी वाढ होऊ शकते, असे संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी सांगितले. यावेळी त्यांनी प्रस्तावित 'एक राष्ट्र, एक निवडणूक' या आराखड्याच्या बाजूने जोरदार मांडणी केली.

या प्रस्तावाची छाननी करणाऱ्या ४१ सदस्यीय संसदीय समितीचे प्रमुख असलेल्या चौधरी यांनी, समितीच्या तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यादरम्यान गांधीनगरच्या गिफ्ट सिटी येथे गुजरात सरकारच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर हे वक्तव्य केले.

चौधरीन यांनी सांगितले की, कोविंद समितीने सुमारे १८,००० पानांचा एक विस्तृत अहवाल सादर केला. हा अहवाल सरकारने स्वीकारला. त्यामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस करण्यात आली होती. या अहवालात राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय निवडणुका झाल्यानंतर १०० दिवसांच्या आत पंचायत आणि नगरपालिका निवडणुका घेण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला होता. या सुधारणेमुळे निवडणुकांचे चक्र कमी होईल आणि सरकारांना प्रशासन, विकास, गरिबी निर्मूलन, शिक्षण, आरोग्यसेवा आणि एकूणच राष्ट्रीय प्रगतीसाठी अधिक वेळ, संसाधने समर्पित करणे शक्य होईल.



# मराठा सेवा संघ महागाव तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

**महागाव | प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत असते. यावर्षीही असाच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मातोश्री विद्यालय महागाव येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीच औचित्य साधून उत्साहात संपन्न झाला. या गुणगौरव सोहळ्याचे उद्घाटक व मार्गदर्शक महागाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम, अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे,मार्गदर्शक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंत देशमुख, प्रमुख पाहुणे काँग्रेस कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष डॉ. अरुण पाटील, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष आशिष गावंडे होते. या गुणगौरव सोहळ्याची सुरुवात राजमाता,राष्ट्रमाता, जिजाऊ व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब लिखित मराठा सेवा संघाने महाराष्ट्राला काय दिले? ही पुस्तिका देऊन करण्यात आले. यानंतर सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते महागाव तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा 2026 इयत्ता दहावी व बारावी मध्ये तालुक्यातून प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या व प्रत्येक शाळेतील पहिल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा घाटंजी येथे पात्र झालेल्या तीन विद्यार्थ्यांचा अशा एकूण 125 गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा गौरवपत्र, मराठा सेवा संघाची शिवधर्म दिनदर्शिका, पुष्पगुच्छ व पेन देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. गटविकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम यांनी विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या कर्तुत्वानुसार आपल्या जीवनाचे सार्थक करावे असे सांगितले तसेच मराठा सेवा संघाचा हा स्तुत्य उपक्रम असून सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री यशवंत देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आत्मविश्वास बुलंद ठेवावा, येणाऱ्या आव्हानांना तोंड द्यावे तसेच छत्रपती संभाजी महाराजांचा कर्तृत्ववान वारसा जपावा असे सांगितले तसेच संस्कारामुळे आलेले श्रीमंती टिकून असते व संस्काराशिवाय आलेली श्रीमंती ही विकाऊ असते असे सांगितले. या गुणगौरव सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे,सहसचिव अमोल जगताप, तालुका अध्यक्ष उदयभाऊ नरवाडे,तालुका सचिव पंकज देशमुख,तालुका सदस्य चतुर्वेद अडकिने, स्वप्निल नरवाडे,तेजस नरवाडे, श्री अभ्यासिका व श्री कम्प्युटर चे संचालक मंगेश पाटील वानखेडे, शिक्षक अमोल शिंदे,रवी भांगे, विजय कदम,अंकुश शिंदे, किशोर सोळंके यांनी प्रयत्न केले.

